-:प्रेस नोट:-

## पुरवठा निरीक्षक, मुलचेरा यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

तहसिल कार्यालय, मुलचेरा ता. मुलचेरा जिल्हा गडचिरोली येथील पुरवठा निरीक्षक श्री. राहूल भाउजी डोंगरे, वय ४० वर्ष, पद-पुरवठा निरीक्षक, वय ४० वर्ष (वर्ग-३) यांना ५,००/- रूपयाची लाच स्विकारतांना ॲन्टी करप्शन गडचिरोली पथकाने आज रंगेहात पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे मु. मुखडी टोला पो. गोविंदपुर ता. मुलचेरा जिल्हा गडचिरोली येथील रहीवासी असुन ते शेतीचा व्यवसाय करतात. तक्रारदाराची आई नामे जिवनकला गेडाम हिचे नावे असलेला रशन कॉर्ड मध्ये वडील, मजवा भाऊ, वहीणी व भावाची मुलगी यांची नावे होती. तक्रारदार यांचे मजवा भाऊ गुरूदास यांच्या कुंटूबाचा नविन रशन कॉर्ड वहीनी नामे वर्षा गुरूदास गेडाम यांचे नावे दि. ३०/११/२०२४ रोजी तयार करण्यात आले. त्यावर थम मशीनवर नाव न आल्याने रशन मिळत नसल्याचे वहीनी वर्षा यांनी सांगीतले. तक्रारदाराचे वहीणीचे रशन कार्डवर रशन मिळत नसल्याने, महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता ५००/-रू. लाच रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली कॅम्प मुलचेरा येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

पोलीस उपअधीक्षक, श्रीमती अनामिका मिर्झापुरे, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पोलीस निरीक्षक, श्रीधर भोसले यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनियरित्या शहानिशा करून सापळ कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदाराचे वहीणीचे रशन कार्डवर रशन मिळत नसल्याने, महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता आरोपी श्री. राहूल भाऊजी डोंगरे, पद-पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय मुलचेरा, ता. मुलचेरा, जि. गडचिरोली यांनी ५००/- रूपयाची पंच साक्षीदारासमक्ष सुस्पष्ट मागणी करून ५००/- रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द पो.स्टे. मुलचेरा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी श्री डोंगरे यांचे आष्टी येथील निवासस्थानाची ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली चम्मु कडुन झडती घेण्यात आली.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, श्री राहुल माकणीकर, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री सचिन कदम, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधीक्षक श्रीमती अनामिका मिर्झापुरे यांचे पर्यवेक्षणात पो.नि. श्रीधर भोसले, पोहवा शंकर डांगे, पोना किशोर जौंजारकर, पोशि संदिप उडाण, संदिप घोरमोडे, चापोना प्रफुल डोर्लीकर, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली
दुरध्वनी क्रमांक:- ०७१३२-२९५०२०
टोल फ्री क्रमांक:- १०६४

(अनामिका मिर्झापुरे)
पोलीस उपअधीक्षक
ला.प्र.वि.गडचिरोली